**साथी संस्था, पुणे संचलित व**
**कर्वे समाज सेवा संस्था, पुणे, मान्यताप्राप्त**

# प्रमाणपत्र कोर्स

## आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व


सामाजिक सेवांच्या उत्तरदायित्वाविषयी स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या
कार्यकर्त्यांचा दृष्टिकोन सखोल व व्यापक करण्यासाठी....

**दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रम कोर्स**

## मोड्युल - २

### आरोग्यसेवांच्या उत्तरदायित्वासाठी

# लोकाधारित देखरेख संकल्पना
















- संकलन व लेखन
  **तृप्ती जोशी**

- मार्गदर्शन
  **डॉ. नितिन जाधव**

- मुखपृष्ठ
  **भाऊसाहेब आहेर**
  **गजानन लोंढे**

- मांडणी
  **शारदा महल्ले**

- **मार्च, २०१६**

- **प्रकाशक**

SATHI
Flat No. 3 & 4, Aman E Terrace, Dahanukar Colony, Kothrud, Pune - 411029
Ph. No. (020) 25472325, 7588032218
Website - www.sathicehat.org, Email - sathicehat@gmail.com

**आयोजक**

साथी

**मान्यता**

ESTD. 1963
कर्वे समाज सेवा संस्था

**अर्थसाहाय्य**

कोपासा

# मोड्युल - २

## आरोग्यसेवांच्या उत्तरदायित्वासाठी

# लोकाधारित देखरेख संकल्पना

सामाजिक सेवांच्या उत्तरदायित्वाविषयी स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या
कार्यकर्त्यांचा दृष्टिकोन सखोल व व्यापक करण्यासाठी....
**दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रम कोर्स**

संकलन
**तृप्ती जोशी**

मार्गदर्शन
**डॉ. नितिन जाधव**

साथी

# या कोर्सविषयी थोडक्यात...

भारतात गेल्या दशकभरात सार्वजनिक आरोग्यसेवांमध्ये सुधारणा घडविण्यासाठी, आरोग्य यंत्रणा व जनतेमध्ये संवादाची प्रक्रिया घडविण्यासाठी, आरोग्य यंत्रणेचे जनतेप्रती उत्तरदायित्व व आरोग्यसेवांमधील पारदर्शकता वाढण्यासाठी विविध संस्था-संगठनांनी प्रयत्न केले आहेत. त्याची परिणिती म्हणूनच भारतात लोकाधारित देखरेखीचे विविध मॉडेल्स विकसित झाले आहेत. तुमच्या सारखे गावपातळीवर काम करणारे कार्यकर्ते विशेष करून लोकाधारित देखरेख राबवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रात तरी लोकाधारित देखरेखीची संकल्पना रुजत आहे. आमच्या मते संकल्पनेचा विस्तार व्हायला हवा. त्यासाठी नवीन कार्यकर्त्यांची फळी उभी करणे ही गरज लक्षात घेता हा कोर्स घेण्यात येत आहे.

हा अभ्यासक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोंकण, उत्तर महाराष्ट्र या विभागातील एकूण १२५ विद्यार्थी कार्यकर्त्यांचा समावेश असणार आहे. प्रत्येक विभागातून २५ विद्यार्थी कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली आहे.

हा कोर्स 'साथी' संस्था'व सामाजिक कार्याची पदवी (MSW) देणाऱ्या 'कर्वे समाजसेवा संस्था' यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येत आहे. या कोर्सला आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व व कृतीसाठी काम करणाऱ्या 'कोपासा' (Community-of Practitioners on Accountability and Social Action in Health) या आंतरराष्ट्रीय समूहाचे आर्थिक सहकार्य मिळाले आहे. हा कोर्स मुख्यत्वे दूरस्थ शिक्षण (distance-learning) प्रकारचा असून या कोर्सचा कालावधी एक वर्षाचा आहे. वर्षभरात दोन संपर्क सत्र आयोजित (contact session) केले जाणार असून पहिले संपर्क सत्र हे ३ दिवसांचे असेल तर दुसरे संपर्क सत्र हे एक दिवसाचे असेल. पहिल्या संपर्क सत्रात सहभागी प्रतिनिधींना प्रशिक्षण व कोर्ससंबंधी प्रशिक्षण साहित्य देण्यात येईल. तर दुसऱ्या संपर्क सत्रात परीक्षा व विद्यार्थी कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात केलेल्या उपक्रमांबद्दल चर्चा करण्यात येईल. विद्यार्थी कार्यकर्त्यांनी पहिल्या संपर्क सत्रानंतर आपल्या कार्यक्षेत्रात मार्गदर्शक पुस्तकात दिल्याप्रमाणे गतिविधी (Field Activity) करणे अपेक्षित आहे.

**या अभ्यासक्रमाचे मुख्य उद्दिष्ट्ये**

- विविध आरोग्यसेवा व सामाजिक सेवांवर उत्तदायित्व हे तत्त्व समजून घेण्यासाठी कार्यकर्त्यांची व्यापक समज आणि दृष्टिकोन विकसित करणे.
- विविध सामाजिक संघटनांकडून ॲडव्होकसीसाठी वापरण्यात येणाऱ्या विविध पद्धतींचा व रणनीतिबाबत दृष्टिकोन व समज वाढवणे.

# मार्गदर्शक पुस्तिका (मोड्युल) विषयी थोडक्यात...

महाराष्ट्रातील जवळपास ३३ तालुक्यात लोकाधारित देखरेख प्रक्रिया राबवण्यात येते. सरकारकडून सर्वसामान्यांना मिळणाऱ्या सेवा गुणवत्तापूर्ण पद्धतीने मिळायच्या असतील तर आपल्या गावातील, वस्तीतील छोटे छोटे गट मिळून देखरेख करू शकतात. गावात येणाऱ्या आरोग्य सेवक, सेविका (ए.एन.एम.) आणि आपल्या जवळच्या प्रा.आ.कें.चे डॉक्टर यांच्याशी संवाद करून आपले प्रश्न सोडवू शकतात.

हे प्रयत्न करण्यासाठी कोणकोणते छोटे प्रयोग करता येऊ शकतात, कोणत्या पद्धती देखरेखीसाठी वापरू शकतात हे या पुस्तकामध्ये दिले आहे. प्रत्यक्ष काही गावांमध्ये घडलेल्या काही रोचक गोष्टी पुस्तिकेमध्ये देण्यात आल्या आहेत.

देखरेख प्रक्रिया आपल्या पातळीवर राबवण्यासाठी नक्की कोणत्या पायऱ्या वापरता येतील त्यांची माहिती आणि प्रात्यक्षिके आणि अनुभव देण्यात आले आहेत. शेवटी सरावासाठी प्रश्न आणि महत्त्वाचे मुद्दे देण्यात आले आहेत.

हे मोड्युल विकसित करण्यासाठी आमच्या 'साथी' संस्थेच्या विविध प्रकाशनांची मदत झाली असून 'कर्वे समाज सेवा' संस्था व आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व व कृतीसाठी काम करणाऱ्या 'कोपासा' या नेटवर्कच्या स्टेअरिंग कमिटीने या मोड्युलचे समीक्षण केले आहे.

# अनुक्रमणिका

प्रकरण १-

‘लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेची’ संरचना.............५

प्रकरण २-

‘लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेतील

महत्त्वपूर्ण घटक ....................................................१५